# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 March 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १७ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- छत्रपती संभाजीनगरमध्ये १८ एप्रिल रोजी निवडणुकीची अधिसूचना, २५ एप्रिल पर्यंत अर्ज दाखल करता येणार
- आचारसंहितेचं काटेकोर पालन करण्याचे प्रशासनाचे निर्देश
- पदयात्रेमुळं हिंदूस्थान जवळून पाहता आला– काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी

आणि

- महिला प्रिमीयर लिग क्रिकेट स्पर्धेतच्या विजेतेपदासाठी आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू दरम्यान विजेतेपदाची लढत

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८ एप्रिल रोजी निवडणुकीची अधिसूचना जारी करण्यात येणार असुन, २५ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येणार आहेत. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज एका पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. २६ एप्रिल रोजी अर्जांची छाननी होणार आहे तर २९ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. १३ मे रोजी मतदान होणार असल्याचं स्वामी यांनी सांगितलं. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या निवडणुकीसंदर्भात अधिक माहिती देताना ते म्हणाले –

> ***२०४० मतदान केंद्रांवर औरंगाबाद लोकसभेचं मतदान संपन्न होणार आहे. एकूण २० लाख ३५ हजार २३ मतदार जवळजवळ नऊ लाख एकोणसत्तर हजार ९५८ महिला मतदार आहेत. आणि पुरूष मतदार आहेत दहा लाख चौसष्ट हजार. संपूर्ण पोलिंग सेंटरचं नियंत्रण हे औरंगाबादमध्ये १३ हे महिलांमार्फत चालणारं पोलिंग सेंटर असेल.***

****

निवडणूक काळात आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाईचा इशारा प्रशासनानं दिला आहे. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर इथं पत्रकारांना या संदर्भातली माहिती दिली. त्या म्हणाल्या -

> ***मसल, मिस इनफर्मेशन, मनी या सगळ्या आपल्याला माहीत आहेत. या चारहीच्या बाबतीत आणि आपला जो ॲक्ट आहे, याच्याप्रमाणे ज्या गोष्टी आहेत, मिस इनफर्मेशन दिली, सोशल मिडीयावरपण आमचं जे पथक आहे, पूर्ण फ्लाईंग स्कॉडस् त्यामध्ये कार्यान्वित राहणार आहेत. सी व्हिजीलसारखे ॲप याठिकाणी कार्यान्वित आहेत. कोणी कुठल्या बाबतीत जाहिरात ही स्पष्ट त्या ठिकाणी नमूद करणं, हे अत्यावश्यक आहे. त्यामुळे याचा जर भंग झाला किंवा या प्रक्रियेला अनुसरून कोणी कार्यवाही केली नाही, तर त्याच्यावर कडक कार्यवाही करण्यात येईल.***

लातूरचे पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन कारवाईसाठी सज्ज असल्याचं सांगितलं.

****

बीड लोकसभा मतदार संघातही आदर्श आचार संहिता लागू झाली असून राजकीय पक्षांनी आणि प्रतिनिधींनी त्याच्या मार्गदर्शक तत्वांचं पालन करावं, असं आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी केलं आहे. बीड इथं जिल्हाधिकारी कार्यालयात या संदर्भातल्या बैठकीत त्या बोलत होत्या. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करताना कार्यालयात पाच प्रतिनिधीनांच प्रवेश देण्यात येईल, असं त्या म्हणाल्या. राजकीय पक्षाशी निगडित विविध मंजुरी एक खिडकी मधून दिली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. बीड जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात म्हणजे तेरा मे रोजी मतदान होणार असून हा काळ विद्यार्थ्यांसाठी सुट्ट्यांचा असतो, त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत अधिकाधिक लोकांनी आणि विशेषतः तरुणांनी भाग घ्यावा, असंही आवाहनही जिल्हाधिकारी मुंडे यांनी केलं.

****

जालना लोकसभेसाठी १९ लाख ३६ हजार ९९० मतदार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज दिली. यामध्ये दहा लाख १८ हजार २५१ पुरुष तर नऊ लाख १६ हजार ३१९ स्त्री आणि ५१ तृतीयपंथीय मतदारांचा समावेश असल्याचं त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. जिल्ह्यात १८ ते १९ या वयोगटातल्या नवमतदारांची संख्या २४ हजार १२१ आहे. ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या तसंच दिव्यांग मतदारांना प्रथमच टपालाद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचं त्यांनी नमूद केलं. या निवडणुकीच्या अनुषंगानं आवश्यक सर्व तयारी केली जात असून, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच पहिलं प्रशिक्षण पूर्ण झाल्याचं जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले. जालना लोकसभा मतदार संघासाठी चौथ्या टप्प्यात तेरा मे रोजी मतदान होणार आहे.

****

सांगली जिल्ह्यात तिसऱ्या टप्यात मतदान होणार असून सात मे रोजी मतदान होईल. या जिल्ह्यात २४ लाख २२ हजार दोनशे मतदान असून, १२ लाख ३६ हजार ३०८ पुरुष मतदार तर ११ लाख ८५ हजार सातशे ७६ स्त्री मतदार असल्याचं जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधि यांनी आज सांगितलं.

****

अमरावती लोकसभा मतदार संघात एकूण १८ लाख २८ हजार ९७० मतदार असून, ९ लाख ४० हजार ८५० पुरुष तर ८ लाख ८८ हजार ३४ स्त्री मतदार आणि ८६ तृतीयपंथी मतदार असल्याची माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज दिली. मतदार नोंदणीसाठी राबवण्यात आलेल्या विशेष मोहिमेत मिळालेल्या प्रतिसादावर मतदार याद्या अंतिम करण्यात येत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. अमरावतीमध्ये २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

****

कन्याकुमारी ते काश्मीर चार हजार किलोमीटरची पदयात्रा केल्यामुळे हिंदुस्थान जवळून पाहण्याची संधी आपल्याला मिळाली, असं काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज सकाळी मुंबईत मणिभवनला भेट देऊन महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर ऑगस्ट क्रांती मैदानापर्यंत न्याय संकल्प पदयात्रा काढली. न्याय संकल्प यात्रेनंतर घेतलेल्या सभेत गांधी बोलत होते. आपण जो हिंदुस्थान समजत होता त्यापेक्षा तो वेगळा असल्याचं या यात्रेतून समजलं, असं त्यांनी नमूद केलं. देशातील सर्वात विद्वान शास्त्रज्ञानाजवळ जेवढं

ज्ञान आहे तेवढंच ज्ञान शेतकऱ्याजवळ आहे. बीडी कामगार महिलांच्या हातात जे कौशल्य आहे त्याचा आदर केला जात नाही. या घटकांना पाठिंबा देणं गरजेचं आहे. त्यांना आर्थिक मदत झाल्यास मोठा फरक पडेल, असं ते म्हणाले. हिंदुस्थान द्वेषाचा देश नाही तर प्रेमाचा देश आहे. भारत जोडो यात्रेतून लोकांशी संवाद साधल्यानं त्यांच्यावर अन्याय होत असल्याचं दिसलं, त्यामुळे दुसऱ्या यात्रेत न्याय हा शब्द जोडला असल्याचं गांधी यांनी सांगितलं. आज संध्याकाळी शिवाजी पार्क इथं गांधी यांच्या या यात्रेच्या समारोपाची सभा होत आहे. विरोधीपक्षांच्या आघाडीतल्या इतर घटकपक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीमध्ये ही सभा होणार आहे.

****

एनआयए-अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं पुण्यात आयसिस या दहशतवादी संघटनेच्या कारवायांप्रकरणी पुण्यातल्या चार स्थावर मालमत्ता दहशतवादाचं उत्पन्न म्हणून जप्त केल्या आहेत. या मालमत्तांचा वापर स्फोटकं बनवणं आणि दहशतवादी कृत्यांचं प्रशिक्षण आणि नियोजनासाठी केला जात होता. एनआयएनं या प्रकरणात सर्व ११ आरोपपत्रं आधीच दाखल केली आहेत.

****

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेदरम्यान आज नागपूर इथं दत्तात्रय होसबळे यांची सरकार्यवाह म्हणून फेरनियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती वर्ष २०२७ पर्यंत असेल, अशी माहिती संघटनेतर्फे सामाजिक संपर्क माध्यमांद्वारे देण्यात आली आहे. होसबळे हे २०२१ पासून या पदावर कार्यरत आहेत.

****

नंदुरबार जिल्ह्यातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधान परिषदेचे आमदार आमशा पाडवी यांनी आज मुंबई इथं एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. आमश्या पाडवी यांनी आदिवासीबहुल नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी समाजासाठी कायम संघर्ष केला, या समाजाला न्याय देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. आज त्यांच्या शिवसेना प्रवेशामुळे या भागातील नागरिकांना दिलासा देणे शक्य होणार आहे, असं मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले. त्यांच्या शिवसेनेत येण्याने या मागास आणि आदिवासीबहुल भागातील लोकांना न्याय देता येणं, शक्य होईल असही शिंदे म्हणाले.

****

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम सामना होणार आहे. नवी दिल्लीतल्या अरूण जेटली मैदानावर हा सामना होईल. संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होणार आहे.

****

दिवंगत नामवंत नाटककार मधुसूदन कालेलकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाचं औचित्य साधून मुंबई इथं परवा– मंगळवारपासून २२ मार्च दरम्यान विशेष नाट्य महोत्सव होत आहे. महाराष्ट्र शासनाचं सांस्कृतिक कार्य संचालनालयासह काही मान्यवर रंगकर्मींच्या विशेष पुढाकारानं हा महोत्सव होत आहे. श्री शिवाजी मंदिर नाट्यगृह इथं या महोत्सवात विनामुल्य नाट्य महोत्सव, तसंच कालेलकरांनी शब्दबद्ध केलेल्या सांगीतिक गीतांच्या मैफिलीचा विशेष सोहळाही होणार आहे.

****

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील कन्हेरवाडीच्या नागरिकांनी त्यांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आज धरणं आंदोलन केलं. या भागात पाणी टंचाई असल्यानं लघू सिंचन धरणातलं पाणी नदीपात्रात सोडण्यात यावं, या प्रमुख मागणीसाठी ग्रामस्थांनी धरणं आंदोलन केलं आहे.

****

राज्यात लोकसभा निवडणुकीतल्या मतदानाची टक्केवारी वाढवून ती ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी म्हटलं आहे. त्यांनी काल मुंबईत पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. गेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात सुमारे ६१ टक्के मतदान झालं. या निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर झाल्यावर त्यासंबंधी राज्यातल्या तयारीची माहिती त्यांनी दिली.

****